
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४४

# महाराजा सयाजीराव आणि बडोद्यातल्या वास्तू

धारा भांड मालुंजकर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४४

# महाराजा सयाजीराव आणि बडोद्यातल्या वास्तू

धारा भांड मालुंजकर

महाराजा सयाजीराव आणि
बडोद्यातल्या वास्तू
इतिहास
धारा भांड मालुंजकर
●
प्रकाशन क्रमांक - ६४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : धारा भांड मालुंजकर
१, निवास ब्लॉसम,
शरणपूर त्र्यंबक लिंक रोड,
कॅनडा कॉर्नर, नाशिक -४२२ ००५
मो. ९८८१७४५६०८
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ६१ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्यातल्या वास्तू

साधारणपणे सोळाव्या शतकापासून पाश्चात्य वास्तुशैलींचे प्रतिध्वनी भारतात उमटू लागले. पोर्तुगीजांनी गोवा ,येथे बांधलेल्या विविध प्रकारच्या वास्तू ही त्याची उत्कृष्ट उदाहरणे होत. नंतर ब्रिटिश राजवटीत युरोपातील नव-अभिजात शैलीवर आधारलेल्या अनेक वास्तू भारतात बांधल्या गेल्या. उदा., बडोद्यातील 'The Maharaja Sayajirao University of Baroda' (१८७९), मुंबईतील 'व्हिक्टोरिया टर्मिनस स्टेशन' (१८८८), बडोद्याचा 'लक्ष्मीविलास पॅलेस' (१८८०-१८९०), कलकत्ता येथील 'व्हिक्टोरिया मेमोरिअल' (१९०८-१२) इत्यादी. गॉथिक, प्रबोधनकालीन, बरोक इ. पाश्चिमात्य शैलींच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या वास्तूंमध्ये भारतीय शैली-वैशिष्ट्यांचा तसा अभावच जाणवतो.

बांधकामाची कला आणि शास्त्र म्हणजे वास्तुकलाशास्त्र. वास्तुकलेला पूर्वी स्थापत्यकला असेही म्हणत असत. वास्तूची रचना, त्यांची अंतर्गत सजावट, बाहेरील बगीचा, नगर नियोजन इ. बाबींचा त्यात समावेश असतो. एखाद्या व्यक्तीची, गावाची,

शहराची, राज्याची, देशाची किंवा खंडाची वास्तूविषयक शैली, जडणघडण किंवा स्वरूप याचा दर्जा बघत असताना वापरण्यात येणारा शब्दप्रयोग म्हणजे वास्तुकला होय. उदा., भारतीय वास्तुशैली, मुघल वास्तुशैली, हेमाडपंथी वास्तुशैली इ. काही वेळा भौगोलिक गरजेनुसार विकसित झालेल्या शैलीला प्रादेशिक ओळख प्राप्त होत असे. जसे केरळची वास्तुशैली, राजस्थानची वास्तुशैली. अनेकवेळा ज्याने शैली विकसित केली असेल त्याच्या नावे ती प्रसिध्द होते. जसे कर्बुझिकर, बाळकृष्ण दोशी, चार्ल्स कोरिया, लॉरी बेकर इत्यादी.

## महाराजांचा जगप्रवास

महाराजा सयाजीराव गायकवाडांनी १८८७ ते १९३८ पर्यंत २६ वेळा जगप्रवास केला. या जगप्रवासातून त्यांनी जो अनुभव मिळविला आणि देशाचार व लोकस्थितीचे अवलोकन केले, त्यातून सयाजीरावांनी बडोदा संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणल्या. युरोप दौरे केल्याने महाराजांमधील कलेची अभिरूची अधिकच जागृत झाली होती. युरोपियन राष्ट्रांप्रमाणे आपल्याही राज्याचे सुशोभीकरण करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. ललितकलांना प्राधान्य देत त्यांनी बडोदा नगरीत सुधारणा घडवून आणण्याचे काम सुरू केले. बडोद्यात बांधलेल्या कलात्मक इमारतींमुळे केवळ कलासक्त लोकांनाच लाभ होणार नाही तर इतर लोकांनाही त्याचा व्यवहारिकदृष्ट्या लाभ होणार असल्याचा विश्वास महाराजांना होता.

मार्च १९३० मध्ये प्रतापसिंह सरोवराच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणात सयाजीरावांनी बडोद्यातील विविध वास्तू निर्मितीमागील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. महाराज म्हणतात, "गेल्या पन्नास वर्षांत या राज्यातील बांधकामांत जे धोरण राखण्यात आले आहे, त्यात मी मुख्यत: दोन तत्वे आपल्या नजरेसमोर ठेवली होती. ज्या ज्या वेळी एखाद्या नव्या संस्थेला जागेची गरज पडते, त्या त्या वेळी ती गरज पुरी करण्याचे दोन मार्ग असू शकतात. एक मार्ग हा की, केवळ व्यावहारिक उपयोगीताकडे लक्ष देऊन संस्थेसाठी बराकीप्रमाणे अथवा वखारीप्रमाणे, वरती छपरे व बाजूंना भिंती असलेल्या खोल्या बांधून आपल्याला गरज भागविता येईल; परंतु या मार्गाचा अवलंब मोठमोठी शहरे बांधणारांनी कधीही केलेला नाही. यासाठी अशा प्रसंगी उपयुक्तता व सौंदर्य या दोन दृष्टींचा मिलाफ करून त्या संस्थेला जागेची असलेली गरज पुरविण्याबरोबरच त्या कामासाठी बांधली जाणारी इमारत ही शहराला भूषणरुप व्हावी, असे धोरण मी नेहेमी ठेवले आहे. प्राचीन काळच्या रोम शहरांचे वैभव तत्कालीन प्रचंड इमारतींवरून समजून येते व मध्ययुगीन रोमचे ऐश्वर्य सेंट पीटर्सच्या प्रचंड मंदिराच्या रुपाने दृग्गोचर होते. पॅरिस शहराचा आत्मा आपल्याशी त्या शहरातील भव्य इमारतींच्या रुपाने प्रत्यक्ष बोलत असल्याचा भास होतो. घाणेरड्या गावांतून घाणेरड्या लोकांचीच पैदास होते.

म्हणून सुंदर इमारतींच्या सांस्कृतिक महत्त्वाकडे मी दुर्लक्ष केले असते, तर माझ्या प्रजेवर मी अन्याय केला असे झाले असते. आपण हिंदी लोक कलाविद्य आहोत या गोष्टीचा आपल्याला अभिमान आहे व तो यथायोग्यही आहे. हिंदू व मुसलमान राजांनी यापूर्वी आपल्या देशात उत्कृष्ट शिल्पकलेचे नमुने म्हणून गाजवण्यासारख्या इमारती बांधून आपल्या देशाला अमूल्य अलंकाराचे लेणे चढविले आहे. या शिल्पकलेची किंमत पाश्चात्य कलेहून कोणत्याही प्रकारे कमी नाही. याच दृष्टीने बडोदे शहर सुंदर न शोभिवंत करण्याचा प्रयत्न मी केला आहे की, जेणेकरून या शहराबद्दल तुम्हाला अभिमान व प्रेम वाटावे. त्याचप्रमाणे शहरांतील रस्ते रुंद करण्यात, त्यात जागोजागी बगिचे बनविण्यात व इतर सुधारणा करण्यातही मी हीच जोडदृष्टी ठेवली आहे की, या सर्वांपासून लोकांना आरोग्याच्या दृष्टीने जसा व्यावहारिक उपयोग व्हावा, त्याचप्रमाणे सौंदर्यदृष्ट्या त्यांच्या संस्कृतीत भर पडावी.” यावरून वास्तुकलेबद्दल महाराजांचे सुरुवातीपासूनचे धोरण काय होते याची कल्पना येते.

## महाराजांचे आवडते बांधकाम खाते

बांधकाम खाते हे महाराजांचे आवडते खाते होते. महाराज कोणत्याही कचेरीत गेले की, “पब्लिक वर्क खात्यात” गेल्याशिवाय राहत नसत. सार्वजनिक बांधकाम खात्याचे काम पाहणे हे त्यांच्या आवडीचे काम असे. बडोद्याचा सर्वांगीण

विकास करत असताना सयाजीरावांनी आवश्यक असलेल्या सार्वजनिक इमारतींच्या बांधकामास प्राधान्य दिले. यामुळे विविध प्रकारच्या आणि कलात्मक वास्तूंनी बडोद्याच्या सौंदर्यात भर पडत गेली. महाराजांच्या व्यापक दृष्टीकोनाने बडोद्याचे रुपांतर संस्कार नगरीत होत गेले. एक एक अप्रतिम वास्तुकलेचा नमुना असणाऱ्या इमारती महाराजांच्या कल्पकतेने बडोद्यात दिमाखात उभ्या राहत होत्या आणि आजही त्याच दिमाखाने वैभवशाली इतिहासाचे दाखले देत आहेत.

महाराज ६ डिसेंबर १९३२ ला विलायतीचा दौरा संपवून भारतात आले आणि लगेच दुसऱ्या दिवशी चीफ इंजिनियरला भेटण्यासाठी कचेरीत गेले. परदेशातून आल्यानंतर सयाजीरावांना सर्वात पहिल्यांदा बांधकाम खात्याच्या कामकाजातली प्रगती तपासण्याचे काम करायचे होते. महाराज कचेरीत जाऊन चालू बांधकाम कुठपर्यंत आले आहे, तयार केलेल्या वास्तू रचना आराखड्यात (building plan) आणि प्रत्यक्षात तयार झालेल्या बांधकामात किती फरक आहे, तो फरक चालणार आहे का नाही, तो सोयीचा अथवा गैरसोयीचा आहे का? असे अनेक प्रश्न विचारून बांधकामाबाबतची त्यांची सजकताच दाखवत. एखादी नवीन संकल्पना महाराजांच्या डोक्यात आली तर ते स्वत:च्या हाताने ती कागदावर उतरवत आणि ती कल्पना आपल्या अधिकाऱ्यांना मोठ्या उत्साहाने सुचवित.

इ. स. १९१८ मध्ये नवयुगात प्रकाशित झालेल्या 'आमची देशी संस्थाने' नावाच्या लेखमालेत वासुदेव तळवळकरांनी बडोद्यातील वास्तुकलेच्या आविष्काराचे चित्तवेधक वर्णन केले आहे. त्यामध्ये तळवलकर लिहितात, "पूर्वीचे बडोदा आणि आताचे बडोदे यात जमीन आस्मानचा फरक आहे. आपले राजधानीचे शहर सालंकृत दिसावे याबद्दल सयाजीराव महाराजांनी नगरबदलाकडे स्वत:च्या हौशीने लक्ष पुरविले आहे. जनतेच्या सोयी पाहताना कलेची दृष्टी आणि प्रगतीची दिशा डोळ्यांपुढे ठेवल्यामुळे पूर्वीच्या वनास आज नंदनाची शोभा आणता आली. स्टेशनपासून मांडवीपर्यंत आल्यास रस्त्याने आजूबांजूस ज्या इमारती दिसतात, त्यांनी शहराला किती सौंदर्य प्राप्त करून दिले आहे, त्याचा विचार मनात उद्भवतो. सुरसागर तलावाच्या उत्तरभागी उभे राहा आणि समोर दिसणारे दृश्य बघावे. समोर मिडल स्कूल, फिमेल ट्रेनिंग कॉलेज यांच्या इमारती आहेत. पूर्व बाजूला जरा आडवी अशी न्यायमंदिराची भव्य इमारत, पश्चिमभागी असलेले फिमेल ट्रेनिंग कॉलेजचे बोर्डिंग, हे पाहताना महाराजांनी हा परिसर किती सुंदरतेने सजविला आहे, याची सत्यता पटेल. याच जलाशयाच्या पूर्वभागी मोठासा बगिचा आणि उत्तरभागी एक भव्य इमारत पुढे मागे होण्याचा संभव आहे, असे त्यांचे नियोजन होते. यातून या परिसराची शोभा द्विगुणित होणार आहे. अशाच प्रकारचा दुसरा एक भाग ते सजवित गेले. स्टेशनवरून निघाले की, पहिल्यांदा हायस्कूलची इमारत आहे. तेथून जरा पुढे आले की, मोठी

भव्य अशी सायन्स इन्स्टिट्यूटची इमारत आहे. त्यानंतर बडोदे कॉलेजची डौलदार भव्य इमारत दृष्टीस पडते. मधे सयाजीराव टॉवर व उजव्या बाजूस दूर जाणारा असा सयाजीगंज रस्ता आहे. त्याच्या टोकाशी असलेली 'अमीन निवास' या नावाची इमारत, असा हा टापू आहे. कॉलेजनंतर महाराजांचा अश्वारुढ पुतळा, काळा घोडा लागतो. पूल ओलांडल्यानंतर राजघराण्यातील राजपुरूषांच्या छब्या, भव्य कीर्तिमंदिर, तसेच इस्पितळाच्या इमारती नगरशृंगाराची साक्ष देतात." (तळवलकर वासुदेव, १९१८, गौरवगाथा, पान नं. २२५, २२६, २२७)

तळवळकरांनी वर्णन केलेल्या नवीन बडोद्यातील प्रेक्षणीय स्थळांविषयी वाचल्यावर आपण स्वप्नातल्या सुंदर आखीव रेखीव नगरीतून सैर करत आहोत, असा भास झाल्याशिवाय राहत नाही. बडोदा ही कल्पकतेने नटलेल्या सुंदर वास्तूंची केवळ स्वप्ननगरी नसून विविध शैलीतल्या स्थापत्यकलांचा वापर करून सजवलेली अद्भुत नगरी आहे. येथील प्रत्येक वास्तूला सयाजीरावांच्या कल्पकतेचा स्पर्श झालेला दिसून येतो. कोठी कचेरी ही महाराजांच्या विविध कार्यालयासाठी उभारलेली भव्य इमारत आहे. ही इमारत विलायतेतील १९०० शतकातल्या इमारतींत शोभून दिसेल इतकी साधर्म्य असलेली आहे. महाराजांनी नगरविस्तार करताना लोकांची योग्य सोय, कलेची दृष्टी, स्थापत्यशास्त्राचे पुनरूज्जीवन, जुन्या कलेची जोपासना इत्यादी घटक नेहमीच नजरेसमोर ठेवले.

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार, शास्त्रग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार'. या सुभाषिताप्रमाणे महाराजांनी आयुष्यभर देशात तसेच परदेशात अनेकदा प्रवास केला. युरोपमधील लंडन, पॅरिस, रोम वगैरे ठिकाणी ते बरेचदा गेले. ही शहरं वास्तुकलेसाठी जगप्रसिध्द आहेत. भव्य कलाकुसरीने सजलेल्या प्राचीन इमारती, चर्च, सार्वजनिक सभास्थळे ही या शहरांची आकर्षणं आहेत. अप्रतिम शिल्पकलेत न्हालेल्या इथल्या प्राचीन इमारतींचा सयाजीरावांवर परीणाम झाला नाही तर नवल! महाराजांच्या आवडी निवडींना योग्य दिशा मिळण्यास ही देशाटनं खूप उपयोगी पडलेली दिसतात. सयाजीरावांची सुक्ष्म निरीक्षण करण्याची वृत्ती आणि जे जे उत्तम आहे ते सर्व आपल्या राज्यात आणण्याची धडपड याची साक्ष त्यांनी बडोद्यात उभारलेल्या भव्य दिव्य इमारतींवरून येते. लक्ष्मीविलास पॅलेस, प्रतापविलास पॅलेस, इंदुमती पॅलेस, राजमहालातले मोझॅकचे काम, मकरपुरा राजवाड्यातील बाग, कॉलेजची इमारत, कीर्तिमंदिर, बडोदा म्युझियम आणि पिक्चर गॅलरी, न्यायमंदिर, चिमणाबाई क्लब, ज्युबिली पार्क, सार्वजनिक बाग, मेल-फिमेल ट्रेनिंग सेंटर, मकरपुरा राजवाडा, कलाभवन, सायन्स इन्स्टिट्यूट, सेंट्रल लायब्ररी, बडोदे हायस्कूल इ. बडोद्यातील या इमारती म्हणजे पाश्चात्य आणि भारतीय वास्तुकलेच्या मिश्रसंस्कृतीचा उत्तम नमूना होय.

बडोद्यातील या अनेक वास्तू सर्वोत्तम स्थापत्यकलेच्या सिद्धांतावर आजही उभ्या आहेत. चांगल्या इमारतींची व्याख्या ही तिच्या प्रमाणबध्द मांडणी, समतोलपणा, वास्तूचे प्रथमदर्शनी भाग आकर्षक (Focal point), योग्य मोजमाप, इमारतीची आकर्षक बाहेरील बाजू, छाया, प्रकाश आणि हवा खेळती राहण्याचे नियोजन, कारागिरांची शिल्पकलेतली कुशलता, इमारती अवतीभोवतीची मोकळी हवेशीर जागा, इमारत दूरून दिसण्यासाठी इमारतीचा उंच भाग यावर अवलंबून असते. बडोद्यातील सगळ्याच इमारती वास्तुकलेच्या या व्याख्येत बसणाऱ्या असून, महाराजांनी बांधकाम खात्यात स्वत: जातीने लक्ष दिल्याचा पुरावाच आहेत. बडोद्यातील बहुसंख्य इमारतींचे श्रेय आर्किटेक्ट चार्ल्स मॉट आणि आर्किटेक्ट रॉबर्ट चिझम यांना दिले जाते.

## बडोद्यातील राजवाडे आणि इतर इमारती

बडोदा शहराच्या मध्यभागी सरकारवाडा म्हणून ओळखला जाणारा राजवाडा आजही अस्तित्वात आहे. इ.स. १८७५ मध्ये या राजवाड्यात राजकुटुंब राहत होते. हा राजवाडा खूप मोठा असला तरी त्यात खेळती हवा आणि प्रकाश येण्याची सोय नाही. अरूंद आणि अवघड जिने, प्रशस्त पण उपयोगात न आणता येणारी मोठाली दालने असा हा राजवाडा एकूणच राहण्यास योग्य नसल्याने त्याच्या शेजारीच नवीन नजरबाग राजवाडा

मल्हारराव गायकवाडांनी बांधला होता. पण त्या राजवाड्यात राहणेही राजमंडळीस पटेना म्हणून मकरपुऱ्यास असलेला राजवाडा त्यावेळच्या रेसिडेंट आणि दिवाणांना राहण्यास दिला; येण्याजाण्यास दूर असल्याने तेथेही गैरसोय होत असे. मोतीबागेतला बंगला लहानखाणी होता; तोही एवढ्या मोठ्या राजकुटुंबाला पुरणार नसल्याने शहराजवळ हवेशीर ठिकाणी नवा राजवाडा बांधण्याचे ठरले. हाच तो 'लक्ष्मीविलास पॅलेस'.

## १. लक्ष्मीविलास पॅलेस (१८९०)

महाराजा सयाजीरावांनी स्वत:च्या कारकीर्दित बडोदे राज्यात तज्ज्ञांच्या मदतीने नवनवीन वास्तूंचे आराखडे तयार करून बांधकाम सुरू केले. सयाजीरावांनी १८९० मध्ये मुख्य गावापासून दूर भव्य राजवाडा बांधला. जो आजही "लक्ष्मीविलास पॅलेस" या नावाने जगप्रसिध्द असून बडोद्याची शान वाढवत आहे. या पॅलेसचे डिझाईन मेजर चार्ल्स मॉन्ट या इंग्रज इंजिनियरला सोपविण्यात आले होते. त्यांनी या राजवाड्याचे डिझाईन इन्डो-सॅरसेनिक (Indo-Carasenic) या स्थापत्याच्या शैलीवर तयार केले आहे; परंतु बांधकाम चालू झाल्यावर ते प्लिन्थलेवलपेक्षा सहा-सात फूटवर आल्यावर एक अघटीत प्रसंग घडला, मेजर मॉन्ट यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या जागी बडोद्याचे इंजिनियर रॉबर्ट चिस्लो यांना राडवाड्याचे पुढील काम सोपविण्यात आले.




लक्ष्मीविलास राजवाड्याचे बांधकाम १२ जानेवारी १८८० (वार सोमवार) दिवशी सुरू झाले. तब्बल १० वर्षांनी म्हणजे इ.स. १८९० ला राजवाड्याचे बांधकाम पूर्ण झाले. त्यावेळी पॅलेसच्या बांधकामाचा खर्च ५० लाख रुपये आला होता आणि एकोणीसाव्या शतकातली एवढी किमती इमारत दुसरी कोणतीही नसावी. राजवाड्याचा एकूण परिसर ७४४ एकराचा असून पश्चिमेकडील व दक्षिणेकडच्या बाजूच्या शेवटी रेल्वेचे फाटे आहेत. या राजवाड्याचे भव्य कलाकुसरीने सज्ज असलेले प्रवेशद्वार पुर्वेकडे आहे. या प्रवेशद्वारावर सुंदर कोरीव काम केलेले आहे. मुख्य दरबाराच्या प्रवेशद्वाराच्या पायथ्यापासून ४-५ फूट उंचीवर हत्तींचे पॅनल आहे. त्याला लागूनच दोन्ही बाजूला चौकीदारांसाठी चौक्या आहेत. या चौक्यांवर सुध्दा सुंदर नक्षीकाम असून त्यांना डेरेदार देखणे घुमट आहे.

मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस नक्षीदार जाळी असून त्यावर अगदी छोटे छज्जे आहेत. ही जाळी बघताना आग्र्याच्या ताजमहालची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तेथे खिडक्या असून त्यावर उत्कृष्ट दगडी कोरीवकाम केले आहे. राजवाड्याचा दर्शनी भाग शिल्पकलेने ओतप्रोत भरला आहे. हे शिल्पकाम मिश्र स्वरुपात केलेले दिसते. त्यात हिंदी शिल्पकला पध्दत वापरली असून, त्यातील काही कमानीत व्हेनिसची शिल्पकला व काही गॉथिक शिल्पकलेचा मिलाप बघावयास मिळतो. मुख्य दरबाराच्या दिवाणखान्याची फरशी व्हेनिसच्या पध्दतीची असून त्यानर इटालियन शिल्पकार फेलीची याने चित्रकला, काव्यकला, मूर्तिकला व शिल्पकला या चार ललितकलांचे दर्शक पुतळे उभे केले आहेत.

तसेच मुख्य दरवाजाला महिरप आहे. त्यावरही सुंदर कोरीव काम केलेले आहे. दरवाजाची जी महिरप आहे तिच्यातील समांतरपणा व त्यावरील कोरीव काम अप्रतिम आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूला असलेले दोन उंच मनोरे व त्याला असलेल्या चौफेर बालकन्या (balconies) तर प्रवेशदाराच्या सौंदर्यात आणखीनच भर घालतात. मध्यभागी असलेल्या अर्धगोलाकृती घुमटाच्या टोकावर असलेला भगवा झेंडा गायकवाड सरकार राजमहालात हजर असल्याची साक्ष देतो. महाराजांचे वास्तव्य जेव्हा राजवाड्यात असे, त्यावेळी लक्ष्मीविलासच्या उंच मनोऱ्यावर

लाल दिवा दिसायचा. मुख्य प्रवेशद्वारावरून राजवाडा आतून किती भव्य आणि कलासंपन्न असेल याची कल्पना करता येते. पूर्वी सकाळ संध्याकाळ या प्रवेशद्वारावर सनईचौघडांचे मंजूळ स्वर ऐकू येत असत.

राजवाड्याची उत्तर दक्षिण लांबी ५१२ फूट असून पूर्व पश्चिम रुंदी २०० फूट आहे. राजवाड्याच्या मनोऱ्याची उंची अंदाजे २०४ फूट आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ ६०,००० स्क्वेअर फूट आहे. राजदरबाराचे मुख्य चार भाग आहेत. त्यातील पहिला भाग राजदरबाराकरिता असून दरबाराच्या लोकांना आत जाण्यासाठीचे प्रवेशद्वार उत्तरेस आहे. दरबार हॉलची लांबी ९४ फूट व रूंदी ५४ फूट आहे. संपूर्ण राजवाडा दोन मजल्यांचा आहे. पहिल्या मजल्यावर तिन्ही बाजूस राजदरबारातल्या महिलांकरीता लाकडी झरोके ठेवण्यात आले आहेत. पूर्वेकडील बाजू ही सिंहासनाकरिता आहे. युरोपात चर्चमध्ये जशा उंच उंच खिडक्यांना रंगीत काचा लावलेल्या असतात तशाच रंगीत काचा दरबार हॉलच्या पूर्वेकडील खिडक्यांवर पहावयास मिळतात. दरबार हॉलच्या भिंतींना संगमरवरीसारखे गुळगुळीत प्लास्टर, राजवैभवास साजेसे मोझॅकचे काम, सोनेरी वर्खाने सुशोभित केलेले छतावरचे काम आणि राजा रवी वर्मांच्या पौराणिक रंगीत पेंटींगमुळे हा दरबार हॉल भारतीय प्राचीन संस्कृतीच्या राजवैभवाने आकर्षित करतो.

राजवाड्याच्या दक्षिण भागात मध्यभागी एक कारंज्याचा चौक आहे. बहुतेकदा महाराजांचे वास्तव्य या भागातच असे. वरच्या मजल्यावर भव्य ग्रंथसंग्रहालय, डायनिंग हॉल, दिवसा राहण्यासाठी खासगी दालने असून दुसऱ्या मजल्यावर शयनागार आणि राजपाहुण्यांची दालने आहेत. महाराजांच्या विभागाच्या दक्षिणेस महाराणी चिमणाबाईंचे निवासस्थान होते. त्याचे प्रवेशद्वार स्वतंत्र ठेवण्यात आले होते. तसेच त्यांना स्वतंत्र दिवाणखानाही होता. तो लक्ष्मीविलास पॅलेसचा चौथा मुख्य भाग होय. तसेच दवाखाना, जामदारखाना, बिलियर्ड रूम, गादी महल हे राजवाड्याच्या पूर्व भागात होते.

संपूर्ण राजवाड्याचे बाहेरून बांधकाम दगडी आहे. त्यामुळे उन्हाळ्यात आतील भाग उष्णतेने गरम होऊ नये म्हणून पुढील बाजूस व मागील बाजूस असंख्य कलात्मक मोठ-मोठ्या खिडक्या ठेवलेल्या आहेत. उत्तर व पश्चिम भाग नक्षीकामाच्या कलाकुसरीने सुशोभित केला आहे. राजवाड्याभोवती सुंदर बगीचा असून मध्यभागी बरेच कारंजे आहेत. सगळा बगिचा सुंदर फुलांनी सुशोभित केला असून, बसण्याकरिता ठराविक अंतरावर संगमरवराच्या बैठकी आहेत. हा विस्तीर्ण बगिचा मि.गोल्डरिंग यांनी बनविला होता. तसेच ब्रॉंझ धातूचे काही उत्कृष्ट शिल्पसुध्दा जागोजागी ठेवण्यात आले आहेत. या वास्तूच्या प्रवेश सोहळ्यासाठी मुंबईचे गव्हर्नर हजर होते. दिवाण सर टी. माधवराव या राजवाड्याचा शिल्पपध्दतीचे वर्णन करताना

म्हणतात, "या राजवाड्याची शिल्परचनापध्दत हिंदुस्थानी अथवा 'इंडो सॅरसेनिक' असून, ती आपल्या परंपरेला अनुसरून केली आहे. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजातील शिल्पपध्दतीचा मिलाप तिच्यात पहावयास मिळतो. इकडील हवामानाप्रमाणे व हिंदू रिवाजांप्रमाणे सुखसोयींची तजवीज करून याची रचना करण्यात आली आहे. या राजवाड्यासाठी लागणारा दगड सोनगडच्या खाणींतून काढण्यात आला होता. राजवाड्यातील मुख्य दरबारचा दिवाणखाना फार भव्य व प्रशस्त असून त्याची लांबी ९३ फूट व रुंदी ५४ फूट असूनही त्यामध्ये एकही खांब नाही हे त्याचं वैशिष्ट्य आहे. या राजवाड्याची बांधणी उत्तर हिंदूस्थानातील शिल्पशास्त्राच्या धर्तीवर आहे. प्रख्यात शिल्पशास्त्रज्ञ व लेखक सर जेम्स फर्ग्युसन या पध्दतीस "आर्य भारती" (Indo -Aryan), सांप्रताय म्हणून संबोधितात आणि पुष्कळ अंशी राजवाडा पाहून जाणाऱ्या मंडळींना तसेच वाटते." हा पॅलेस बंकिंग हॅम पॅलेस च्या चार पट आकारात बनलेला खाजगी निवास स्थान म्हणून ओळखला जातो.

अशा प्रकारे लक्ष्मीविलास पॅलेस आजही त्याच दिमाखात उभा असून पर्यटकांना आपल्या उंच मनोऱ्याच्या पसरलेल्या बाहूंनी आकर्षित करत आहे. अशा या भव्य राजवाड्यात १० फेब्रुवारी १८९० ला महाराज राजकुटुंबासह राहण्यास गेले.

## २. मकरपुरा (१८९०)

महाराज खंडेराव गायकवाड यांच्या कारकिर्दीत बडोद्यापासून ४ मैल दूर असलेला मकरपुऱ्याचा राजवाडा शिकारीच्या सोयीसाठी म्हणून बांधला होता. पुढे १८८३ मध्ये महाराजा सयाजीरावांनी त्यांच्या कारकिर्दीत या राजवड्यातील एक भाग नवीन सुधारीत पध्दतीने बांधून घेतला. तो १८९० साली पूर्ण झाला. याचे नकाशे मि. स्विझम यांच्याकडून तयार करून घेतले



होते. हा राजवाडा विटबांधकामात बांधला आहे. हा राजवाडा इटालियन रेनीसॉन्स (renaissance) म्हणजे प्रबोधनकाळाच्या धर्तीवर बांधला आहे. या राजवाड्याभोवती जापानी पध्दतीची बाग असून त्यात संगमरवरी कांरजे, सभा मंडप, ठिकठिकाणी पूर्णाकृती पुतळे (Life size), भोवताली हिरवेगार अंगण आणि

विविध फुलांचे सुंदर ताटवे पसरले होते. त्यामुळे सगळीकडे प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. महाराजांनी या सुंदर बागेची रचना करण्याचे काम विलायतेतील सुप्रसिध्द बागवान मि. गोल्डरिंग यांच्यावर सोपविले होते.

## ३. प्रतापविलास पॅलेस (१९०८)

प्रताप विलास पॅलेस चे बांधकाम १५ फेब्रुवारी १९०८ रोजी सुरु झाले आणि ३० जुलै १९१४ रोजी पूर्ण झाले. हा पॅलेस बडोदा - दभोई रेल्वे भागाच्या दक्षिणेला लाल बागे जवळ असल्याने त्यास लालबाग पॅलेस असे ही म्हणत. कालांतराने




त्याला बरोद्याच्या शेवटच्या राज्यकर्त्याच्या नावाने ‘‘प्रताप विलास पॅलेस” म्हणून ओळखले जाऊ लागले. खास युवराज

फत्तेसिंहराव गायकवाड यांच्यासाठी हा राजवाडा बांधण्यात आला होता. हा राजवाडाही दगडी असून इंग्लिश रेनीसॉन्स (renaissance) अर्थात प्रबोधनकाळाच्या धर्तीवर बांधला होता. या राजवाड्याचे नकाशे मुंबईचे शिल्पशास्त्रज्ञ मि. स्टिव्हन्स यांच्याकडून करून घेण्यात आले होते. चार्ल्स एफ स्टीवन्स (मुंबई येथील प्रसिद्ध विक्टोरिया टर्मीनसची रचना करणारे ब्रिटीश आर्किटेक्ट एफ.डब्लू. स्टीवन्स यांचे चिरंजीव.)

## ४. इतर राजमहल

आपल्या पूर्वजांनी बांधलेला नजरबाग राजवाडा सुस्थितीत ठेवण्याची व्यवस्था महाराजांनी केली होती. सयाजीराव महाराजांच्या काळात पाहूण्यांसाठी म्हणून राजवाड्याचा वाढीव भाग वापरण्यात आला होता. इ. स. १९२७ मध्ये नजरबाग राजवाड्यातील जवाहीरखान्यात खंडेराव महाराजांनी मक्केस पाठविण्याकरीता तयार करून घेतलेले मोत्याचे दोन सुंदर गालिचे ठेवण्यात आले होते. या जवाहीरखान्यात असलेल्या दागिन्यांची किंमत त्या काळातील एक कोटी डॉलर्स इतकी होती. १२५ कॅरेटचा ‘स्टार ऑफ द साऊथ’ (Star of the South) हा हिऱ्यांचा नेकलेस, त्याच्यासोबत एक ७८.५ कॅरेटचा ‘इंग्लीश ड्रेसडेन’ English Dresden, a drop shaped diamond of about 78.5 carats) हे मौल्यवान दागिने राजखजिन्यात होते.

महाराजांनी इ.स. १८८० च्या दशकात महाराणी चिमणाबाईंच्या स्मरणार्थ एक महल बांधला होता राजकन्या इंदिराराजे यांच्या जन्मानंतर हा पॅलेस 'इंदूमती पॅलेस' या नावाने ओळखला जाऊ लागला. हा महल लक्ष्मीविलास पॅलेसच्या अगदी समोर बांधण्यात आला होता. या पॅलेसचा उपयोग राजकुटुंबाचे फोटोग्राफ्स आणि ऐतिहासिक पुस्तके ठेवण्यासाठी केला जाऊ लागला. लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये राहायला जाण्याआधी इंदूमती पॅलेसमध्ये दरवर्षी गणेशोत्सव साजरा केला जात असे. हा पॅलेस म्हणजे मराठा पद्धतीचा वाडा, मुघल आणि देशी पध्दतीचा सुरेख मिलाप असलेला वास्तुकलेचा नमुना आहे. या पॅलेसच्या कंपाऊंडमध्ये अशोक बंगला आणि बकूळ बंगला असे दोन बंगले होते. पण काही काळापूर्वी ते नष्ट करण्यात आले आहेत.

युवराज शिवाजीराव उत्तम क्रिकेट खेळत असत. त्यांच्यासाठी १९३६ मध्ये शिवमहल पॅलेस बांधण्यात आला. परंतु वयाच्या २९ व्या वर्षी आजारी पडून त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचे सुपुत्र उदयसिंह गायकवाड या शिवमहल पॅलेसॅध्ये राहू लागले. लक्ष्मीविलास पॅलेसच्या हिरवळीवर मोतीबाग नावाचा छोटेखानी बंगला आहे. हा मोतीबाग बंगला लक्ष्मीविलास पॅलेसचे बांधकाम चालू असताना ब्रिटिश आर्किटेक्ट आणि इंजिनिअर्स लोकांचे राहण्याचे ठिकाण होते. सध्या तेथे गायकवाड बडोदा गोल्फ क्लब हाऊस आहे. हा छोटेखानी बंगला सुध्दा कल्पकतेने बांधलेला आहे.

याशिवाय महाराजांनी उटकमंडला (आताची उटी) वुड स्टॉक बंगला बांधला होता. याच्या जोडीलाच 'जयसिंग व्हिला' हा छोटा बंगला बांधला. या बंगल्याभोवती सुंदर बाग केली होती. या बंगल्याच्या रचनेसंबधी त्यांनी आपली कल्पकता वापरली होती. त्यांनी आर्किटेक्टला पत्र लिहून उटीचे घर कसे हवे आहे ते कळविले होते. या पत्रातून महाराजांची वास्तूबद्दल असणारी कलाभिरूची दिसून येते. तसेच मुंबईच्या मलबार हिलवरील 'जयमहाल पॅलेस' ही प्रसिध्द इमारत महाराजांचे मुंबई वास्तव्यादरम्यानचे निवासस्थान होते.

बडोदा शहारात राजवाड्यांव्यतिरिक्त वास्तुकलांचे अनेक उत्कृष्ट नमुने आहेत. जगभरातल्या वास्तुकलाप्रेमींना आजही ते आकर्षित करतात. जगभरातून या शास्त्राचे अनेक विद्यार्थी, या अनोख्या देशी-मुस्लिम पध्दत आणि युरोपियन शिल्पकलेच्या मिश्रणातून परीणाम साधलेल्या इंडो-सॅरसेनिक शैलीचा अभ्यास करण्यासाठी येतात. भारतीय हस्तकला आणि समृध्द परंपरेला या वास्तुकलेत प्राधान्य दिले आहे. जुन्या बडोद्यात अशी बरीच उदाहरणे सापडतात. जुन्या बडोदा शहराचे चार दरवाजे, मांडवी क्षेत्र, सार्वजनिक पुतळे, सार्वजनिक इमारती, संग्रहालय, कचेरी, न्याय मंदिर, हॉस्पिटल, महाविद्यालय ही या शहराला वास्तुकलेच्या दृष्टीने वरदान मिळालेली उदाहरणे आहेत.

महाराजा सयाजीरावांच्या कारकीर्दीतील वास्तुकलेचे उत्तम नमुने असलेल्या काही इमारती पुढे देत आहे.

## ५. बडोदा महाविद्यालय (The Maharaja Sayajirao University of Baroda) (१८७९)

बडोदा कॉलेजची इमारत १८८३ मध्ये बांधून पूर्ण झाली. त्यावर सुमारे ८ लाख रुपये खर्च करण्यात आला होता. शिल्पशास्त्रज्ञ मि. चिझम यांनी या इमारतीचा नकाशा तयार केला होता. या इमारतीचे मुख्य आकर्षण म्हणजे याचा घुमट. हा घुमट सॅरसेनिक म्हणजे मुसलमानी वास्तुकला शैलीचा आहे.



भारतात विजापूरचा गोल घुमट हे एक उदाहरण आहे. यानंतर दुसऱ्या क्रमांकाचा घुमट बडोदा कॉलेजच्या इमारतीचा आहे. या घुमटाच्या आतील भाग विविध बांधकामाच्या शैलीत बांधला आहे. हा गोल घुमट हिंदुस्थानात इंग्रजी सत्ता प्रस्थापित

झाल्यावर पाश्चात्य शिल्पशास्त्रज्ञांनी प्रथमत:च बांधला होता. त्यामुळे त्यावेळेस मुसलमानी घुमट शैलीकडे सगळ्यांचे लक्ष वेधले गेले होते. म्हणून वास्तुकलेत या इमारतीचे महत्व वाढले होते.

आशिया खंडातील भव्य घुमटांमध्ये विजापूरच्या गोल घुमटानंतर या वास्तूच्या घुमटाचा क्रमांक लागतो. कॉलेजच्या इमारतीचे काम पूर्ण झाल्यावर मि. चिझम विलायतेस परत गेले. तेथे त्यांनी 'Royal Institute Of British Architects' या सभेपुढे घुमट व त्याची शास्त्रीय बांधणी या विषयावर एक निबंध वाचला होता. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने बडोदा कॉलेजच्या घुमटाचे वर्णन केले होते. या छोट्या महाविद्यालयाचे मोठ्या वटवृक्षात रुपांतर होऊन आज ही संस्था 'The Maharaja Sayajirao University Of Baroda' या नावाने जगप्रसिध्द झाली आहे. हे असे एकमेव विद्यापीठ होते जिथे मातृभाषा आणि आंग्लभाषा ही शिक्षणाची माध्यमे होती.

## ६. सयाजीबाग (कामटी बाग) (१८७९)

८ जानेवारी १८७९ ला महाराजांनी उद्घाटन केलेल्या या बागेचा विस्तार सुमारे ११३ एकर आहे. या बागेची रचना विश्वामित्री नदीच्या रम्य काठी करण्यात आली आहे. नदीच्या किनारी असल्यामुळे उन्हाळ्यातही थंड वारे बागेला उल्हासित ठेवतात. या बागेतले पुतळे, लांबच लांब रस्ते, दुतर्फा वाढलेली झाडे, उंचच उंच वृक्ष, नदीवरचा झुलता पूल आणि सर्व प्रकारचे




पशुपक्षी लोकांना आकर्षित करतात. या बागेत चित्रसंग्रहालय (Picture Gallery), वादन मंदिर (Band Stand) वगैरे इमारतींचा समावेश आहे. या बागेत श्वेत मंदिर (Whit Pavilion) असून ते वगळता सर्व भाग लोकांच्या वापरासाठी खुला ठेवण्यात आला आहे. या बागेत फुलांचे घड्याळ बसवण्यात आले आहे. फुलांचे घड्याळ ही हिंदुस्थानातील पहिलीच निर्मिती होती. या घड्याळात तास, मिनिट आणि सेकंदाचा हात असून तो २० फूट (६.१ मीटर) व्यासाच्या डायलवर फिरतो. घड्याळ हलविणारी यंत्रणा भूमिगत आहे, घड्याळाला नैसर्गिक स्वरूप देण्यात आले आहे. या बागेचा उपयोग लोकांचे आरोग्य, मनोरंजन आणि सामाजिक उपक्रमासाठी केला जातो.

## ७. बडोदा सेंट्रल जेल (१८८१)

इ. स. १८८१ मध्ये मध्यवर्ती कारागृहाची इमारत बांधून पूर्ण झाली. या बांधकामासाठी एकूण ६,७२,००० रु. खर्च करण्यात आला. हिंदूस्थानातील नमुनेदार कारागृहाची रचना अभ्यासून




बडोद्यातील कारागृह बांधण्यात आले. कारागृहाची रचना वर्तुळाकृती असून केंद्रस्थानी रक्षकाकरता उंच मनोरा बांधण्यात आला आहे. बंदिवासीयांची शय्यागृहे, एकांतवासाच्या जागा परिघाचे समान भाग करणाऱ्या अनेक त्रिज्यांवर करण्यात आल्या असल्यामुळे अंतस्थ रक्षकांचे कार्य फार सुलभ झाले

आहे. कारागृहाचा बाह्य तट चतुष्कोणी असून चारही कोपऱ्यांवर व मध्यभागी रक्षकाकरिता मनोरे बांधण्यात आले आहेत. पूर्वाभिमुख तटाच्या मध्यभागी प्रवेशव्दार असल्याने तेथे पहाऱ्यासाठी मनोरे नाहीत. तटाच्या आत रूग्णालय, बंदिवासास धंदेशिक्षण देण्याचा वर्ग व कार्यालय वगैरे सोयी करण्यात आल्या आहेत. तटाबाहेर अधिकारी वर्गासाठी निवासस्थाने असून सभोवती कृषीकर्मासाठी विस्तृत आवार आहे.

मध्यवर्ती कारागृहात न्यायप्रविष्ट कैद्याकरता (undertrial prisoners) स्वतंत्र गृह असून त्यांचा गुन्हेगारांशी संबंध येणार नाही असा बंदोबस्त करण्यात आला आहे. येथे विशिष्ट प्रकारचे व उत्तम वर्तणुकीचे गुन्हेगार ठेवण्यात येत असत. १६ ते २१ वर्षाच्या आतील गुन्हेगारांची सोयही येथेच करण्यात येत असे. या कारागृहात उत्तम गालिचे, सतरंज्या, वेतकाम, सुती व रेशमी कापड वगैरे जिन्नस तयार होतात. तसेच तटाबाहेरच्या भागात बागाईत करण्यात येते. बंदिवासीयांची मने सुसंस्कृत व्हावी व त्यांची स्थिती सुधारावी या उच्च हेतूने नीती व सदवर्तन या विषयांवर आठवड्यातून एक दिवस बोधपर उपदेश करण्यात येत असल्याचे १८८३-८४ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येते. बडोद्यानंतर नवसारी, अमरेली, मेहसाणा, द्वारका वगैरे ठिकाणीही कारागृहे बांधण्यात आली आहेत. (तळवलकर वासुदेव, १९१८, गौरवगाथा, पान नं.२३१-३२)

## ८. संगीत महाविद्यालय (ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळा) (१८८६)

महाराजांनी बडोद्यात सर्व जाती-धर्मांच्या मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले होते. त्यासाठी ॲग्लो व्हर्नाक्युलर ही शाळा बांधण्यात आली. या शाळेत त्यावेळी पहिली ते चौथी पर्यंत मराठी, गुजराती, उर्दू या भाषा शिकविल्या जात होत्या. उस्ताद मौलाबक्ष खाँ यांना महाराजांचा आश्रय होता.



1875:- Anglo-Vernacular School Now Music Collage

महाराजांच्या हुकुमावरून बडोद्यात उस्ताद मौलाबक्ष खाँ साहेब यांनी गायनशाळा सुरू केली. या गायनशाळेचे वर्ग नंतर ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळेत भरू लागले. २६ फेब्रुवारी १८८६

ला त्याचे संगीत महाविद्यालयात रुपांतर करण्यात आले. या महाविद्यालयाचे प्राचार्य उस्ताद मौलाबक्ष खाँसाहेब हे होते. हे महाविद्यालय सूरसागर तलावाजवळ आहे. आजही ते उत्तमरित्या चालू आहे.

या इमारतीचे काम विल्यम इमरसन (William Emerson) यांनी पाहिले होते. या संगीत महाविद्यालयात गायन, वादन आणि नृत्य यांचे शास्त्रीय शिक्षण दिले जाई. या ठिकाणी जगभरातून विद्यार्थी शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी येतात. बरेच प्रसिध्द कलावंत या संगीत विद्यालयात माजी विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य म्हणून काम करून गेलेले आहेत. उस्ताद मौलाबक्ष खाँ, उस्ताद फैयाझ खाँ, उस्ताद अब्दुल करीम खाँ, उस्ताद अत्ता हुसैन खॉ, उस्ताद सादीकी हुसैन खाँ, उस्ताद नसर हुसैन खाँ, उस्ताद हजरत इनायत खाँ, गायनाचार्य पंडित मधुसुदन जोशी, पंडित विष्णू नारायण भातखंडे, ही काही संगीत विश्वातली अजरामर नावे आहेत. ही सर्व तज्ञमंडळी एकेकाळी बडोद्यातल्या या संगीत शाळेशी जोडले गेलेले होते.

महाराजांनी संगीतशास्त्राचा अभ्यासक्रम नव्याने व्यवस्थित तयार करण्यासाठी पंडित विष्णू नारायण भातखंडेंना या संगीत महाविद्यालयात निमंत्रीत केले होते. त्यांनी या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात बरेच बदल करून नोटेशनची पुस्तके तयार करून दिली होती. महालिद्यालयाची इमारत वास्तुकलेतला एक उत्तम नमुना म्हणून सर्वश्रुत आहे.

## ९. सर सयाजी जनरल हॉस्पिटल (१८८६)

इ.स. १८८५ मध्ये महाराणी चिमणाबाई (पहिल्या) या त्यांच्या पहिल्या बाळंतपणात गुंतागुंतीच्या दुर्धर आजारात मरण पावल्या. या घटनेने महाराज खूप दु:खी झाले आणि याचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. आरोग्य सुविधांच्या अभावामुळे कोणत्याही व्यक्तिला आपले प्राण गमवावे लागू नये या विचाराने सयाजीरावांनी अत्याधुनिक सोयी




सुविधांनीयुक्त जनरल हॉस्पिटल उभारण्याचे ठरविले. ८ नोव्हेंबर १८८६ ला हे सार्वजनिक रुग्णालय बांधून तयार झाले. त्याचे उद्घाटन व्हाईसरॉय लॉर्ड डफरिन यांच्या हस्ते करण्यात आले. १८९६ मध्ये महाराजांनी नर्सिंग कॉलेज सुरू केले. हॉस्पिटलच्या मूळ इमारतीच्या आजूबाजूच्या इमारती पाहिल्या की, हे एक

मोठे कार्यक्षेत्र असल्याची जाणीव होते. स्वातंत्र्यानंतर गुजरात सरकारने या हॉस्पिटलचे व्यवस्थापन आपल्या हाती घेतले आणि त्यास महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. या हॉस्पिटलभोवती आरोग्यास आणि मनास प्रसन्न वाटण्याच्या हेतूने सुंदर बाग फुलवली होती.

## १०. कलाभवन (Faculty of Technology and Engineering) (१८९०)

इ.स. १८९० मध्ये ''कलाभवन तांत्रिक संस्था'' म्हणून सेनापती भवन मधून प्रत्येकशात या संस्थेचा प्रवास सुरु झाला १९४९ मध्ये ते तंत्रज्ञान आणि अभियांत्रिक विज्ञान शाखा म्हणून



महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठात समाविष्ट करण्यात आले सेनापती भवनातून थोड्या काळासाठी हि विद्या शाखा

चालल्या नंतर इ.स. १८९२ मध्ये महाराजांनी राजवाड्याची ही इमारत या संस्थेला भेट दिली ही इमारत प्रत्यक्षात एक महल होती अशाच काही नोंदी सापडतात. इ.स. १८९२ मध्ये ही इमारत संस्थेचे प्राचार्य टी. के. गज्जर यांचे विनंती वरून संस्थेस देण्यात आली. भारताच्या इतिहासात अनेक क्षेत्रांतील एकापेक्षा एक असे मौल्यवान हिरे निर्माण केले. सयाजीरावांची कलाभवनची ही संकल्पना काळाच्या किती पुढे होती याचे आज आपण साक्षीदार आहोत. तंत्रज्ञान युगाच्या अगदी प्रारंभीच्या काळात कलाभवन उभारले गेल्यामुळे भारताच्या प्रगतीच्या इतिहासात कलाभवनचे महत्त्व असाधरण आहे. कलाभवन हे जर्मनीच्या शिक्षण संस्थेची सुधारलेली आवृत्ती आहे. कलाभवनचा विस्तार खूप मोठा असून तेथे इंजिनिअरिंग, आर्किटेक्ट, विणकाम, नाट्यसंगीत, छायाचित्र या विविध विषयांचे शिक्षण दिले जाई.

कलाभवनची इमारत ब्रिटिश स्थापत्यकलेवर आधारीत बांधलेली आहे. वरून पाहिले की या इमारतीचा आकार इंग्रजी अक्षर 'E' सारखा दिसतो. दगडी बांधकाम, गोल कमानी दरवाजे, उंच खिडक्या अशी ही दोन मजली इमारत ब्रिटिश वास्तुशैलीचा उत्तम नमुना आहे. आजही कलाभवन चांगल्या स्थितीत आहे. २२०० चौरस मीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या या इमारतीचे मुख्य आर्किटेक्ट ए. एच. कोयल होते. तसेच आर्किटेक्ट चार्ल्स मॉट आणि आर. एफ. चिझम हेदेखील कलाभवनच्या प्रकल्पात सहभागी होते.

## ११. आजवा तलाव बांधकाम (सयाजी सरोवर) (१८९२)

आजवा तलावाचे (धरण) बांधकाम २९ मार्च १८९२ ला पूर्ण झाले. महाराजांनी सर्वसामान्य जनतेसाठी भरपूर समाजिक बांधकामे करून बडोदा संस्थान सर्व दृष्टीने परिपूर्ण करण्याचा ध्यास घेतला होता. बडोद्याच्या पाणीपुरवठा योजनेसाठी हे धरण बांधले गेले. या याोजनेचे वैशिष्ट्य म्हणजे, हे धरण उंच



जागी बांधले असून बडोदा शहर उताराच्या बाजूला असल्याने गुरूत्वाकर्षणाचा वापर करून जनतेला शुध्द पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या धरणाच्या कामासाठी ३४ लाख रुपये खर्च केल्याची नोंद सापडते. या सयाजी सरोवराच्या

उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणात महाराज म्हणतात, “माझ्या प्रजाजनास शारीरिक स्वास्थ प्राप्त करून देण्याची माझी इच्छा असून त्या कामी त्यांच्या सहकार्याची मला जरूरी आहे. त्यांनी थोडेबहुत पुस्तकी ज्ञान मिळवावे, म्हणजे मला त्यांना विश्वासात घेता येऊन आपल्या कामात भागीदारही बनविता येईल. सर्व प्रकारचे कायदे, नियम, सरकारी नेमणूक प्रसिध्द करण्याची माझी इच्छा आहे; पण या माहितीचा उपयोग करून घेण्याइतके शिक्षण लोक घेतील की नाही, हा प्रश्न आहे. मला आशा आहे की, माझे प्रजाजन तितके शिक्षण जरूर घेतील.” (भाषण संग्रह १, भाषण क्र. १३, पान नं. १९)

## १२. बडोदा म्युझियम आणि पिक्चर गॅलरी (१८९४)

बडोदा म्युझियम आणि पिक्चर गॅलरीच्या इमारतीचा नकाशा मेजर मिंट आणि रॉबर्ट चिझम (**Major Charles Mant and Robert Chisholm**) यांनी तयार केला होता. बडोदा म्युझियमची इमारत १ जून १८९४ साली बांधून पूर्ण झाली. तर बडोद्याच्या पिक्चर गॅलरीचे बांधकाम १९०८ मध्ये चालू झाले. ते १९१४ ला पूर्ण झाले. या विस्तारलेल्या भव्य इमारतीची रचना लंडनच्या व्हिक्टोरीया आणि अल्बर्ट हॉल सारखी केलेली आहे. याची रचना इंडो-सॅरसेनिक शैलीचा (**Indo-Saracenic**) वापर करून केली असून छत्री, तोरण आणि कमानींचाही भरपूर वापर केला आहे. इमारतीचा तळमजला पाहिला की, त्यावरील युरोपियन वास्तुकलेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. वस्तुसंग्रहालय आणि चित्रसंग्रहालयात भरपूर




प्रकाश आणि खेळती हवा याचे उत्तम नियोजन केले गेले आहे. या संग्रहालयासाठी महाराजांनी स्वत: खरेदी केलेल्या भरपूर वस्तू भेट दिल्या आहेत, शिवाय या दोन्ही संग्रहालयाकरिता नवीन वस्तू व चित्रांच्या खरेदीसाठी खाजगी खात्यातून भरपूर पैसे खर्च केले. बडोद्यातल्या जनतेमधील कलाभिरुची वाढावी आणि विद्यार्थ्यांना जगाच्या कानाकोपऱ्यातील कलेचे अवलोकन करून आस्वाद घेता यावा, हाच मुख्य हेतू डोळ्यासमोर ठेवून या भव्य इमारतीची निर्मीती केली होती. महाराजांच्या विचारांमधील व्यापकता येथे दिसून येते. ही दोन मजली इमारत वास्तुविशारद (Architect) लोकांसाठी नेहमीच प्रेरणादायी ठरत आली आहे.

## १३. चिमणाबाई न्यायमंदिर (१८९६)

महाराजांनी महाराणी चिमणाबाई (पहिल्या) यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ही इमारत बांधली होती. व्हाईसरॉय लॉर्ड एल्जिन यांच्या बडोदा भेटीवेळी ३० नोव्हेंबर



१८९६ ला त्यांच्या हस्ते या न्यायमंदिराचे उद्घाटन झाले. त्यावेळी

यास 'श्री. चिमणाबाई न्यायमंदिर' असे नाव देण्यात आले होते. आजही ही वास्तू सूरसागर तलावाजवळ उभी आहे. या इमारतीचा नकाशा मि. आर. एफ. चिझम यांनी तयार केला होता. ही इमारतसुध्दा इंडो-सॅरसेनिक शैलीतच बांधली गेली आहे. ही इमारत चार एकरमध्ये पसरली असून स्वातंत्र्यानंतर ती बडोदा जिल्हा न्यायालय म्हणून ओळखली जाऊ लागली.

## १४. सयाजीविहार क्लब (१८९९)

इ.स. १८९९ च्या एप्रिल महिन्यात बडोद्यात सयाजीविहार क्लब सुरू करण्यात आला होता. हा क्लब खंडेराव मार्केट



जवळ असून महाराजांनी मूळत: क्रीडा विषयक कार्यक्रमासाठी म्हणून बांधला होता. या इमारतीचा अर्धा खर्च बडोदे सरकारने दिला होता. या क्लबच्या उद्घाटनप्रसंगी महाराज म्हणतात, "अशा सामाजिक संस्थांचा मुख्य उपयोग समाजात प्रेमळ विचार विनिमय व परस्पर प्रेम संबंध उत्पन्न व्हावा हा असून, येथील सभासद या क्लबात येताना आपले त्रस्त मनोविकार बाहेर ठेवून व येथून बाहेर जातांना आतील प्रेमळ मनोविचार घेऊन जातील. अशी आशा व्यक्त करतो." पुढे याच भाषणात सयाजीराव स्त्रीयांबद्दल म्हणतात, "आताशा स्त्रियांनाही स्वत:चे क्लब असावेत असे फार वाटू लागले आहे. आधुनिक काळाने एक नव्याच प्रकारची स्त्रीजात निर्माण केली आहे आणि तिची अशी महत्वाकांक्षा दिसते की, आपण पुरुषांची नुसती बरेबरीच करून थांबू नये; पण श्रीपुरुषांमधली आजच्या नात्यात शक्य तर उलटापालटदेखील करून टाकावी. युरोपमध्ये खास स्त्रियांचेच असे स्वतंत्र क्लब निघालेले आहेत आणि हिंदी स्त्रियासुध्दा स्वत:च्या पाश्चिमात्य भगिनींचे अनुकरण झपाट्याने करू लागल्या आहेत. आपल्या सामाजिक परिस्थितीत होऊ घातलेला हा फरक पचनी पाडून घेण्याच्या खटपटी आपल्या समाजशरीकाला असह्य व घातुक अशा अपचनाची बाधा न झाली म्हणजे मिळवली." (भाषण संग्रह १, खंड १, भाषण क्र. १७, पान नं २७)

## १५. सरकारी कचेऱ्या आणि कोठी कचेरी (१९०३- आताचे जिल्हाअधिकारी कार्यालय)

ब्रिटीशांच्या अंमलात कोठी कचेरी बांधून झाली होती. नंतर मात्र १८९५ पर्यंत सर्वच कचेऱ्या, पोलीस ठाणी, न्यायमंदिर वगैरे इमारती बांधून झाल्या होत्या. नवसारीची मुख्य कचेरी बांधण्यास त्याच काळात सुरुवात झाली. अमरेलीची



मुख्य कचेरी महाराजांच्या कारकिर्दीत मि. चिझन यांच्या निगराणीखाली १८९३ मध्ये बांधून पूर्ण झाली होती. मेहसाणा येथील कचेरीची इमारत मुसलमानी वास्तुकला शैलीत बांधली असून मि. स्टिव्हन्स यांनी हे बांधकाम पाहिले होते. या कचेरीचे काम कलात्मक आणि कौतुकास्पद झाले असल्यामुळे या कचेरीला पूर्ण होण्यास १८९३-१९०३ अशी तब्बल दहा वर्षे लागली होती. वाढत्या राज्यकारभारातील प्रशासकीय कामांचे

रेकॉर्ड ठेवण्यासाठी १८९५ ला 'रेकॉर्ड टॉवर' या नावाची स्वतंत्र इमारत कोठी कचेरीसमोर बांधण्यात आली. रेकॉर्ड ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारत बांधावी लागणे म्हणजे महाराजांनी बडोद्यात केलेल्या सुधारणा आणि प्रगतीचे प्रमाणपत्रच होय.

इ.स. १९०७ च्या सुमारास खाजगी खात्याकडील जुना सरकारवाड्याची इमारत कचेऱ्या व शाळांकरिता इमारत खात्याकडे सोपविण्यात आली. पुन्हा इ.स. १९१३ मध्ये खास दप्तरे ठेवण्यासाठी रेकॉर्ड टॉवरच्या धर्तीवर 'रेकॉर्ड ब्लॉक' नावाची नवीन इमारत बांधण्यात आली. त्याचवर्षी ऑफीस ब्लॉक नावाची आणखी एक लहानशी कचेरी बांधण्यात आली. हे दोन्ही टॉवर रेन्सान्स धर्तीवर बांधले होते. याचे नकाशे मद्रासचे शिल्पशास्त्रज्ञ मि. कॅंबेल यांनी तयार केले होते. मि. कॉईल यांनी कोठीस जोडून हुजूर मध्यवर्ती कचेरी बांधली. यामध्ये मध्यवर्ती कचेरी आणि धारा सभेचा दिवाणखाना ही मुख्य दालनं आहेत. तर दप्तरखाना तळघरात आहे. ही कचेरी इंग्लंडच्या गॉथीक शैलीत बांधली आहे. महाराजांच्या कारकिर्दीच्या आधी सर्व कचेऱ्या एकाच ठिकाणी होत्या. परंतु महाराजांनी राज्यकारभारात आणि बडोद्यात केलेल्या सुधारणांमुळे कामकाज वाढत गेले आणि नवीन नवीन कचेऱ्या, इमारती बांधल्या गेल्या. परिणामी वेगवेगळ्या खात्याच्या कचेऱ्या वेगवेगळ्या (separate) झाल्या. वाढत्या राज्यकारभारास दर ५-७ वर्षांनी एक नवीन इमारत लागू लागली. प्रसंगी कचेऱ्यांसाठी नवीन इमारत बांधण्याचे नकाशे

तयार ठेवण्यात येऊ लागले. बडोद्यात कोठी कचेरीही एक मेव्ह स्कॉटिश शैलीत बांधलेली इमारत आहे. ही कोठी इ.स. १९२२ मध्ये बांधली गेली या इमारतीचे काम आर्किटेक कोयल यांनी पहिले ही इमारत ८०,००० चौरस फूटांवर पसरलेली आहे. ही इमारत स्कॉटलंड च्या ''बाल्मारेल'' किल्याची आठवण करून देते महाराज सयाजीराव आणि बरोद्याचे दिवाण यांनी या इमारतीतूनच राज्यकारभार केला. येथे एक सभागृह व शाही कक्षां बरोबर इतर सरकारी कामांसाठी चाळीस खोल्या आहे. ही इमारत १९४८ पर्यंत बरोडा दरबारचे सचिवालय होते आजही बरोडा जिल्याचे हे जिल्हाधिकारी कार्यालय आहे.

आजच्या काळात आपल्याला महाराजांच्या या अफलातून व्यवस्थापनाला 'मॅनेजमेंट गुरु'(management guru) असे म्हणावे लागेल. चिमणबाग खानगी कचेरी आणि जयसिंहराव लायब्ररी यांच्या आजूबाजूच्या उघड्या मैदानात अशीच एखादी कचेरी बांधण्यासाठी मोकळे मैदान राखून ठेवण्यात आले होते.

## १६. ज्युबिली गार्डन (१९०६)

प्रचंड सौंदर्यदृष्टी असलेल्या महाराजांनी शहराचे सुशोभिकरण करताना ठिकठिकाणी हॉस्पिटल, कॉलेज, हायस्कूल, सरकारी इमारतींभोवती बागबगिचे करवून घेतले. यामुळे शहराला एक विशिष्ट शोभा आली होती. महाराजांचा रौप्य महोत्सव १९०६ साली साजरा करण्यात आला होता. त्याच्या स्मरणार्थ शहराच्या मुख्य भागी एक बाग करण्यात आली. त्यास ज्युबिली गार्डन




म्हणतात. हा भाग आजूबाजूला दाट वस्तीचा असल्याने तेथे ही बाग बनविण्यात आली होती.

ज्युबिली पार्कमध्ये संध्याकाळी खूप गर्दी असते. या बागेतच गौतम बुध्दाचा ध्यानस्थ अवस्थेतील पुतळा बसविण्यात आला आहे. या पुतळ्याच्या कोणशिलेवर बौध्द धर्माची मूलतत्वे कोरण्यात आली आहेत. ३१ डिसेंबर १९१० मध्ये या बुध्दाच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी महाराजांनी केलेले भाषण खूप सुधारणावादी असून, आजच्या काळातही खूप उपयुक्त ठरणारे आहे. यावेळी महाराज म्हणतात, “हिंदुस्थानास जर ऊर्जिताकाळ यावयाचा असेल, तर तो एकी व विद्या यावाचून कधीही यावयाचा नाही. मी आपल्या राज्यात सक्तीचे शिक्षण सुरु केले आहे. त्याबद्दल लोकांस अडचणी येतात, असे लोकांचे म्हणणे

आहे; परंतु अडचणी सहन केल्यावाचून फायदा व्हावयाचा नाही. अडचणी सोसून पुढे होणाऱ्या फायद्याकडे नजर दिल्यास, शेवटी कल्याण होणार आहे. आपण मानसिक व शारीरिक बलाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. सुशिक्षित लोकांस शारीरिक शक्ती बरीच कमी असते. शिक्षणासंबंधी विचार करताना आपल्या शारीरिक संपत्तीकडे विशेष लक्ष द्यावे असे माझे मत आहे. आपल्याकडील लोकांचा शारीरिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे की काय, हे मला सांगता येत नाही. तरी आपल्या लोकांस शारीरिक संपत्तीचीही विशेष जरूरी आहे. यासाठी आपण आपल्या मुलामुलींच्या शारीरिक बलाकडे विशेष लक्ष देऊन यथाशक्ती आपले कर्तव्य कराल अशी मला आशा वाटत आहे.” (भाषणसंग्रह १, खंड १, भाषण क्र. ६७, पान नं.२३२)

## १७. खंडेराव मार्केट (१९०६)

११४ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी प्रजेला एकाच ठिकाणी भाजीपाला, फळे आणि रोज लागणाऱ्या अत्यावश्यक गोष्टी एकाच छताखाली मिळण्याची सोय करून देण्यासाठी खंडेराव मार्केटची निर्मिती केली. या मार्केटला आपल्या वडीलांचे म्हणजे ‘महाराजा खंडेराव’ यांचे नाव देऊन १९०६ मध्ये शहराच्या मध्यभागी खुल्या जागेत हे मार्केट सुरू केले. आज आपण ज्याला सुपर मार्केट म्हणतो तीच कल्पना महाराजांनी ११४ वर्षांपूर्वी वापरली होती. ही इमारत चिरेबंदी दगडात बांधली आहे. या इमारतीच्या मध्यभागी असलेले दोन उंच मिनार या इमारतीची




भव्यता वाढवतात. तसेच या शिखरांसमोरील सैनिकाचा पूर्ण पुतळा या इमारतीच्या सौंदर्यात अजूनच भर घालतो. १०० वर्षांपूर्वीची ही इमारत आजही त्याच कर्तव्यात रूजू आहे. आजही या इमारतीच्या तळमजल्यावर पूर्वीसारखाच भाजीबाजार फुलतो. पहिला मजला म्युनिसिपलच्या कार्यालयास दिलेला आहे.

## १८. बडोदा हायस्कूल (१९०९)

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८९३ मध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली. यामुळे शालेय विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाऊन बडोदा राज्यात प्राथमिक आणि विद्यालयीन मुलांसाठी शाळेच्या इमारती बांधाव्या लागल्या. हायस्कूलसाठी स्वतंत्र इमारत नसल्याने सुरुवातीस काही काळ





बडोदा कॉलेजच्या इमारतीत हायस्कूलचे विद्यार्थी बसत होते. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने कॉलेजच्या इमारतीत हायस्कूलच्या विद्यार्थांना ही जागा कमी पडू लागली. वाढता शिक्षणाचा प्रसार आणि अपूरी जागा यामुळे १९१३ मध्ये हायस्कूलसाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे निश्चित झाले. पुढे १९१७ ला हायस्कूलची इमारत बांधून पूर्ण झाली. या इमारतीचे नकाशे सर विल्यम इमर्सन यांच्याकडून तयार करून घेतले होते. एक थर लाल विटांचा आणि दुसरा थर पांढऱ्या दगडांचा अशा क्रमाने रचना असलेल्या भिंतीची ही इमारत पौर्वात्य शिल्पकलेच्या पध्दतीने बांधली असल्याने बाह्यस्वरूप आपले लक्ष वेधून घेते. ही प्राचीन बायझेंटाईन (Byzantine) रचना पध्दत आहे. कॉस्टॅटिनोपल शहरात या रचनेतील अनेक मंदिरे महाराजांनी पाहिली होती.

## १९. बडोदा सेंट्रल लायब्ररी (१९१०)

बडोदा सेंट्रल लायब्ररी ही भारतातील महत्त्वाची सार्वजनिक लायब्ररी म्हणून ओळखली जाते. ही इमारत १९१० मध्ये बांधण्यात आली. लोकांना जाण्यास सहज शक्य व्हावे म्हणून हे ग्रंथालय शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच जुन्या शहरात चंपानेर गेटजवळ मांडवी भागात उभारले आहे. ही इमारत




भूकंप प्रतिरोधक तसेच कीड/वाळवी प्रतिरोधक केलेली असल्याने इथे शेकडो वर्षांपूर्वीचे ग्रंथ चांगल्या प्रकारे जतन केलेले आहेत. भविष्यातील कित्येक पिढीस लाभ घेता येईल हे दूरदृष्टीचे धोरण ठेऊन ही इमारत बांधलेली आहे. २००१ साली सगळ्या गुजरातला भूकंपाचे धक्के बसले होते आणि आश्चर्य



Mobile Library ही कल्पना भारतात महाराजांनी सर्व प्रथम चालू केली.

म्हणजे या ग्रंथालयाच्या रॅकमधून एकही पुस्तक जमिनीवर पडलेले आढळले नाही. यावरून या इमारतीच्या बांधकामाच्या कौशल्याची कल्पना येते.

## २०. कीर्तिमंदिर (१९१५)

"मरावे परी कीर्तिरूपी उरावे" या म्हणीप्रमाणे महाराजा सयाजीरावांनी आपल्या थोर पूर्वजांच्या कार्याची स्मृती सदैव आपल्याला राहावी या हेतूने १५ जानेवारी १९१५ ला कीर्तिमंदिर उभारण्याचे ठरविले. त्यांनी स्वत: युरोप दौऱ्यात अशी स्मृतीदालने पाहिली होती. आपले कर्तृत्वान पूर्वज, राज्याच्या प्रगतीसाठी योगदान दिलेले ज्येष्ठ मंत्री, दिवाण आणि इतर सरदार यांचे अर्धपुतळे बनवून कायमस्वरूपी त्यांचे स्मरण राहण्यासाठी

कीर्तिमंदिराची इमारत बांधण्यात आली. महाराजांनी फ्रान्समध्ये पॅन्थीऑान व इंग्लंडमध्ये वेस्टमिनिस्टर बे येथे असलेले 'Temple of fame' पाहिल्यावर आपल्या राज्यातही अशी इमारत असावी ज्याच्या माध्यमातून आपला दैदीप्यमान इतिहास चांगला जपता येईल. याच विचारातून महाराजांनी बडोद्यात कीर्तिमंदिराची इमारत उभारली.



बडोद्यातील या कीर्तिमंदिराची बांधकाम शैली प्राचीन हिंदू वास्तुकलेवर आधारीत आहे. कीर्तिमंदिराच्या गोलार्धावर सूर्य आणि चंद्र यांबरोबर पृथ्वीचा गोलाकार बनविला गेला आहे. 'या पृथ्वीवर जोपर्यंत सूर्य आणि चंद्र अस्तित्वात आहे तो पर्यंत कीर्तिमंदिरातील महात्म्यांचे स्मरण चिरकाल होत राहणार आहे,' असा संदेश आपल्याला या शिल्पकलेतून मिळतो. हिंदू

वास्तुकलेचा अप्रतिम नमुना म्हणून या वास्तुकलेकडे पाहिले जाते. कीर्तिमंदिर हे श्रध्दा, विश्वास आणि सौंदर्य यांचे प्रेरणास्थान आहे. ते निर्माण करून महाराजांनी त्यांची इतिहासाप्रति दूरदृष्टी दाखवून दिली आहे. बडोदा राज्याचे आर्किटेक्ट श्री. व्ही. आर. तळवळकर यांनी या इमारतीची रचना केली आहे. आतील भागाची रचना आर्किटेक्ट स्टीव्हन्स यांनी केली. ही इमारत इंडो-सॅरसेनिक वास्तुशैलीत बनवली असून ३५ मीटर उंच आहे.

७ फेब्रुवारी १९३६ ला कीर्तिमंदिराच्या उद्घाटन सोहळ्यात केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, "या कीर्तिमंदिराची योजना, सदगुणांचा अभ्यास आणि आचरण यांची प्रेरणा देण्याकरिता आहे. ज्यांनी ही आचरणात आणून आपल्याला आणि संस्थानाला भूषविले असेल त्यांच्या स्मरणाकरिता आहे. सदगुणांची वाढ करा आणि खालील संस्कृत सुभाषित सदैव ध्यानात ठेवा."

शरीरस्य गुणांना च दूरमत्यन्तमन्तरम् ।
शरीरं क्षणविध्वंसि कल्पान्तस्थायिनो गुणा: ।।

(अर्थ : शरीर आणि गुण यात महदंतर असते. शरीक क्षणात नाहीसे होते, तर गुण हे कल्पान्तापर्यंत टिकतात.) (भाषण संग्रह २, भाषण क्र. २१२, पान नं ३८६)

महाराजांवी १९१५ मध्ये स्कॉटिश नगर रचनाकार सर पेट्रिक गिडिस यांना शहर नियोजनासाठी बडोद्यात बोलावले होते.

नगर रचनाकार सर पेट्रिक गिडिस हे त्यांच्या conservative surgery म्हणजेच वास्तविक सामाजिक, एखाद्या ठिकाणची प्रतिकात्मक परिदृश्य यांचे अस्तित्वातील महत्व लक्षात घेता सर्वांत अनुकूल भविष्यातील विकास. या धर्तीवर त्यांनी बडोदा शहरातील अस्तित्वातील रचनांबाबत काही बदल सुचविले होते. याचबरोबर त्यांनी बडोद्यातील प्रसिध्द पोळबाबत पुर्नरचना करण्याचे तसेच सूरसागर तलावाचे स्थान पाहता, तेथेही नागरी मनोरंजनाच्या दृष्टीने नवीन रचनेबाबत निर्देश केल्याचे आढळते. काही मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, जोडणी व दुतर्फा वृक्षलागवड अशा अनेक छोट्या; पण महत्वाच्या सूचनाही त्यांनी केलेल्या आहेत. महाराजांनी यातील अनेक सूचनांचे अवलंबन केल्याचे दिसून येते. (भांड बाबा, २०१९, सयाजीरावांची ओळख, १५०)

## बडोद्यातील वास्तूंवर झालेला खर्च

बडोदा संस्थानच्या एकूण उत्पन्नापैकी दरवर्षी १५ टक्के उत्पन्न सार्वजनिक बांधकामावर खर्च करण्यात येत असल्याचे संस्थानच्या प्रशासकीय अहवालावरुन दिसून येते. यामध्ये रस्ते, पाटबंधारे, सार्वजनिक इमारती इत्यादिंचा समावेश आहे. महाराजा सयाजीरावांनी त्यांच्या कार्यकाळात बडोद्यात अनेक वास्तू निर्माण केल्या. त्यापैकि काही वास्तूंवर आलेला खर्च खाली देत आहे.

## वास्तूंवर झालेला खर्च

| अ.क्र. | वास्तूचे नाव | खर्च (लाख) |
|---|---|---|
| १ | बडोदा कॉलेज | ८.३ |
| २ | मिडल स्कूल | १.४ |
| ३ | फिमेल ट्रेनिंग कॉलेज | ०.९ |
| ४ | मेल ट्रेनिंग कॉलेज | १. १ |
| ५ | म्युझियम | २.६ |
| ६ | पिक्चर गॅलरी | १.६ |
| ७ | सार्वजनिक बाग | १९.२ |
| ८ | ज्युबिली पार्क | ०.५ |
| ९ | कलाभवन | ५.५ |
| १० | कीर्तिमंदिर | ४.१ |
| ११ | लक्ष्मीविलास पॅलेस | ५२.२ |
| १२ | मकरपुरा राजवाडा | १२.८ |
| १३ | प्रतापविलास | १२.० |
| १४ | चिमणाबाई न्यायमंदिर | ७.३ |
| १५ | खंडेराव मार्केट | १.४ |
| १६ | सेंट्रल जेल | ७.७ |
| १७ | हॉस्पिटल्स | ६.८ |
| १८ | वॉटर वर्क्स | ४३.० |

| | | |
|---|---|---|
| १९ | सायन्स इन्स्टिट्यूट | ६.३ |
| २० | सेंट्रल लायब्ररी | १.९ |
| २१ | बडोदे हायस्कूल | २.८ |
| २२ | ड्रेनेज काम | २५.० |

टीप : वरील आकडे लाखात आहेत याची नोंद घ्यावी.

वरील यादीत पाटबंधारे, रेल्वे व बडोदे शहराशिवाय राज्यातील इतर ठिकाणी बांधलेल्या इमारतींचा उल्लेख केलेला नाही. एकंदर झालेल्या खर्चाचा आकडा जवळ जवळ २१ कोटीपर्यंत गेलेला आहे. महाराजांच्या कारकिर्दीत बांधली गेलेली प्रत्येक वास्तू ही तिच्या ठाई वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असून, आजच्या आधुनिक वास्तूंसोबत तितक्याच दिमाखाने आपले वेगळेपण जपत उभ्या आहेत. प्रत्येक वास्तू उत्तम कला आणि रचनेचे उदाहरण आहे. आजही आर्किटेक्ट आणि वास्तुकलेचा अभ्यास करण्यासाठी कित्येक लोक बडोद्यास येतात.

बडोद्यातील सर्व वास्तू एका ठिकाणी नेऊन ठेवल्या तर बडोदे हे परदेशातच आहे असे वाटल्याशिवाय राहणार नाही. बडोद्यात अशा इमारती निर्माण करण्यामागे सुबक नगर रचना हा महाराजांचा उदात्त हेतू होता. जगावेगळ्या भक्कम इमारतींमुळे बडोदे शहर प्रगतशील शहर म्हणून ओळखले जाऊ लागले. या सर्व वास्तूंचे बांधकाम व्यवस्थित पार पाडताना महाराजांनी निवडलले वास्तुतज्ज्ञ, आर्किटेक्ट, इंजिनियर्स आणि एकूणच

संपूर्ण बांधकाम खाते यांच्याकडून कामे करून घेण्याची सयाजीरावांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. अनेकदा वेगवेगळ्या इमारतींची बांधकामे एकाच वेळी चालू होऊन जवळ जवळ एकाच तारखेला पूर्ण झालेली दिसतात. महाराजांचा एकाच वेळी अनेक कामे करण्याचा आवाका आणि विधायक कामांच्या व्यापक दृष्टीमुळे आज बडोदा शहर भारतातच नव्हे तर जगात महाराजा सयाजीराव गायकवाडांचे बडोदा म्हणून चिरकाल स्मृतीत राहणार आहे.

●●●

# संदर्भ

१) गायकवाड सयाजीराव, २०१७, भाषण संग्रह खंड १, भाग १-२, संपादक : रमेश वरखेडे, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) गायकवाड सयाजीराव, २०१७, पत्रसंग्रह खंड १ ते ३, भाग १-३, संपादक : अेकनाथ पगार, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) गायकवाड सयाजीराव, २०१९, महाराज सायाजीरावांचा जगप्रवास भाग १-३, संपादक : बाबा भांड, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) आपटे नागेश दाजी, १९३६, श्री महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड १ ते ३, प्रकाशक लेखक खुद, बडोदे

५) भांड, बाबा, २०१७, गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६) भांड बाबा, मगर डॉ. राजेंद्र  २०१९, समाजशिल्पशास्त्रज्ञ सायाजीरावांची ओळख, महाराजा सयाजीराव संशोधन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com